## प्रेस नोट

श्री.संतोष काकडे तहसिलदार चिखली यांचेकडुन चिखली तालुक्यातील सर्व अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत धान्याचा लाभ घेणा-या सर्व लाभार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, चिखली तालुक्यातील अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यापैकी 197093 एवढया लाभार्थ्यांची ई.के.वायसी. करणे प्रलबिंत आहेत. रेशन कार्डमधिल सर्व लार्भार्थ्यांचे ई के वाय सी आधार प्रमाणिकरण दि.30 जुन पर्यंत करणे शासनामार्फत बंधन कारक करण्यात आले असल्याने ई के वाय सी न केल्यास लाभार्थ्यास धान्य मिळणार नाही. या कारणास्तव **चिखली तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकानांमध्ये दि.29 व 30 जुन 2024 रोजी विशेष मोहिम** राबविण्यात येणार असुन सर्व लाभार्थ्यांनी आपल्याशी संबधित रास्त भाव दुकानदाराकडे आपले स्वत:चे आधार कार्ड सोबत घेऊन जावे व ई के वाय सी करुन घ्यावी. कार्डावर नमुद ग्राहकाचे ई के वाय सी अनेक प्रयत्नानंतरही अपडेट होत नसेल तर त्याला आधार केंद्रात जाऊन बायोमेट्रिक अपडेट करता येईल. अपडेट झाल्यानंतरच त्यांचे ई के वाय सी होईल. सध्या प्रत्येक रेशन दुकानात ग्राहकाच्या ई के वाय सीची प्रक्रिया सुरु आहे. लाभार्थ्याने ई के वाय सी न केल्यास व लाभार्थी धान्यापासुन वंचित राहल्यास याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

तहसिल कार्यालय चिखली

**तहसिलदार, चिखली**

**प्रति:- 1. सर्व पत्रकारांना विनंती करण्यात येते की, सदरील प्रेस नोट लोकहितार्थ आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये प्रसिध्द करावी.**

Scanned with OKEN Scanner